# सांगलीत २३ पासून किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सव

## *प्रियदर्शनी कर्वे यांना वसुंधरा सन्मान पुरस्कार जाहीर

सांगली : प्रतिनिधी

सांगली फिल्म सोसायटीच्यावतीने २३ सप्टेंबरपासून किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सांगलीतील गणेशनगर येथील रोटरी हॉल या ठिकाणी सुरु होणार असल्याची माहिती सोसायटीचे अध्यक्ष अशोक सावंत, उपाध्यक्ष अरुण दांडेकर यांनी पत्रकार बैठकीत दिली. या महोत्सवात २० राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चित्रपट दाखवले जाणार आहेत.

सकाळी शहरातील २४ शाळांमधून शालेय मुलांसाठी 'हसत खेळत पर्यावरण' या विषयावर कार्यशाळा घेण्यात येणार आहे. दररोज सायंकाळी ५.३० पासून चित्रपट दाखवले जाणार आहेत. भारतातील सर्वात मोठा महोत्सव पर्यावरण, वन्यजीवन, ऊर्जा, हवा, पाणी या पाच विषयांना समर्पित आहे. यंदाचा चित्रपट महोत्सव हा रिड्यूस, रिसायकल, रिप्लेस, रिटर्न आणि रियूज या विषयांवर आधारित आहे.

राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय २० चित्रपट, दर्जेदार छायाचित्रांचे प्रदर्शन आणि फोटो वॉक, २४ शाळांमधून शालेय विद्यार्थ्यांसाठी हसत-खेळत कार्यशाळा, ग्रीन टेक्नॉलॉजी या विषयावर चर्चासत्र, महिला-नागरिक-कॉलेज-शालेय विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम, घोषवाक्य स्पर्धा आणि वसुंधरा सन्मान व मित्र पुरस्कार आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन, अशी या चित्रपट महोत्सवाची वैशिष्ट्ये आहेत. या चित्रपट महोत्सवात शिक्षणमहर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या नात आणि एनर्जी सेव्हिंगबाबत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पुण्याच्या प्रियदर्शनी कर्वे यांना यावर्षीचा वसुंधरा सन्मान पुरस्कार देण्यात येणार आहे.

दै. केसरी :- दि. २०/९/२०१४